क्रमांक : ९३४३/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ मे, २०२३

**प्रेषक :**

**सचिव-१,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्याबाबत**

**महोदय/ महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे **सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजीपासून** विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक १८ मे, २०२३ रोजी** ई-मेलद्वारे पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार **पहिल्या टप्प्यासाठी** मा.सदस्यांकडून प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना **मंगळवार, दिनांक ३० मे, २०२३ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत मंगळवार, दिनांक २० जून, २०२३ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल. संसदीय कार्य विभागाने तीन आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ ते शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एक आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

मा.सदस्यांनी मंगळवार, दिनांक ३० मे, २०२३ रोजी पहिल्या टप्प्याकरिता सादर केलेल्या तारांकित प्रश्नांचा लेखाजोखा (तपशील) संबंधित मा.सदस्यांना सोमवार, दिनांक १९ जून, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल. **तसेच तारांकित प्रश्नांचा प्राथम्यक्रम ही बाब पूर्णत: गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे सदस्यनिहाय बॅलटची कार्यवाही पूर्ण झाल्यावर मा.सदस्यांनी प्रश्नांच्या प्राथम्यक्रमांबाबतचा तपशील बॅलटच्या दिवशी म्हणजेच मंगळवार, दिनांक २० जून, २०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने भरुन अद्ययावत करावा.**

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**(राजेश तारवी)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

G:\Other computers\Main PC\Main\Rotation\पावसाळी अधिवेशन, २०२३\2023(६) चक्रानुक्रम + पत्रक भाग दोन.doc

# महाराष्ट्र विधानपरिषद
# पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक १८ मे, २०२३/ वैशाख २८, १९४५ शके**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ मधील द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

**७७.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ मधील द्वितीय (पावसाळी) अधिवेशन कालावधीकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक खालील विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्यापूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील दर्शविण्यात आलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. (पृष्ठ क्रमांक ३ ते ५)

**मा.सदस्यांकडून मंगळवार, दिनांक ३० मे, २०२३ रोजी स्वीकारण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत मंगळवार, दिनांक २० जून, २०२३ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल.**

**सदरहू बॅलटच्या वेळी ऑनलाईन उपस्थित असलेल्या सदस्यांनंतर ऑनलाईन अनुपस्थित असलेल्या सदस्यांना क्रमाने घेऊन मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फेऱ्यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) एकदाच घेण्यात येईल. त्यामुळे उपस्थित व अनुपस्थित सदस्यांचे वेगवेगळे बॅलट न काढता सर्व सदस्यांची ऑनलाईन उपस्थिती ग्राह्य धरुन एकदाच पाच फेऱ्यांमध्ये बॅलट काढण्यात येईल.**

**तसेच, मा.सदस्यांकडून शुक्रवार, दिनांक १६ जून, २०२३ रोजीपासून स्वीकारण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न मंगळवार, दिनांक २० जून, २०२३ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**विधानपरिषद तारांकित प्रश्न सूचना स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही करण्यासाठी QIS या संगणकीय प्रणालीचा वापर होत असून मा.सदस्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील.**

## विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) बंदरे आणि खनिकर्म मंत्री | सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३<br>सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३<br>सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३<br>* सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ | शुक्रवार, दिनांक १६ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २३ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ३० जून, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक ७ जुलै, २०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| दोन | (१) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री | मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३<br>मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३<br>मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३<br>*मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ | शुक्रवार, दिनांक १६ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २३ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ३० जून, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक ७ जुलै, २०२३ |
| तीन | मुख्यमंत्री | बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३<br>बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३<br>बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३<br>*बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ | शुक्रवार, दिनांक १६ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २३ जून, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ३० जून, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक ७ जुलै, २०२३ |
| चार | (१) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) कामगार मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३<br>गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३<br>गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३<br>*गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२३ | सोमवार, दिनांक १९ जून, २०२३<br>सोमवार, दिनांक २६ जून, २०२३<br>सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३<br>*सोमवार, दिनांक १० जुलै, २०२३ |
| पाच | (१) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री<br>(२) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(४) कृषि मंत्री<br>(५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ | मंगळवार, दिनांक २० जून, २०२३<br>मंगळवार, दिनांक २७ जून, २०२३<br>मंगळवार, दिनांक ४ जुलै, २०२३<br>*मंगळवार, दिनांक ११ जुलै, २०२३ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ ते शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवडयाच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १८ मे, २०२३

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति,

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
(४)संगणक कक्ष व MKCL कक्ष

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

**(१) श्री. एकनाथ संभाजी शिंदे --- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी वगळून)
(२) नगरविकास विभाग
(३) माहिती तंत्रज्ञान विभाग
(४) माहिती व जनसंपर्क विभाग
(५) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)
(६) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(७) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (पणन विषयक बाबी)
(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(९) महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विषयक बाबी)
(१०) मृद व जलसंधारण विभाग
(११) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
(१२) अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभाग
(१३) दिव्यांग कल्याण विभाग आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

**(२) श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस --- उप मुख्यमंत्री**

(१) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विषयक बाबी वगळून)
(२) वित्त विभाग
(३) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी वगळून)
(४) विधी व न्याय विभाग
(५) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग
(६) गृहनिर्माण विभाग
(७) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा विषयक बाबी)
(८) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)

**(३) श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील --- महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)
(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विषयक बाबी)

**(४) श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार --- वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)

**(५) श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील --- उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**

(१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

**(६) श्री. विजयकुमार कृष्णराव गावित --- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

**(७) श्री. गिरीश दत्तात्रय महाजन --- ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

(१) ग्रामविकास व पंचायत राज विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)

**(८) श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील --- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

**(९) श्री. दादाजी दगडू भुसे --- बंदरे आणि खनिकर्म मंत्री**

(१) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (खनिकर्म विषयक बाबी)

**(१०) श्री. संजय दुलीचंद राठोड --- अन्न व औषध प्रशासन मंत्री**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

**(११) श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे --- कामगार मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)

**(१२) श्री. संदिपानराव आसाराम भुमरे --- रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**

(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

**(१३) श्री. उदय रविंद्र सामंत --- उद्योग मंत्री**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)

**(१४) श्री. तानाजी जयवंत सावंत --- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

..५/-

**(१५) श्री. रविंद्र दत्तात्रय चव्हाण --- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**(१६) श्री. अब्दुल सत्तार --- कृषि मंत्री**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषि विषयक बाबी)

**(१७) श्री. दिपक वसंतराव केसरकर --- शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)

(२) मराठी भाषा विभाग

**(१८) श्री. अतुल मोरेश्वर सावे --- सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**

(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार विषयक बाबी)

(२) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**(१९) श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई --- राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

**(२०) श्री. मंगल प्रभात लोढा --- पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री**

(१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)

(२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

(३) महिला व बालविकास विभाग